महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २७३ वा | दिनांक : ३१/०८/२०२५ | वार : रविवार

## मराठवाड्यातील मराठे कुणबी असल्याचे तत्वतः मान्य: शिंदे समितीचा जरांगेंना शब्द



**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिंदे समितीला चर्चेसाठी पाठवून राज्याच्या राज्य सरकारसह राज्याच्या राजभवनाचा व दोन्ही कायदेमंडळांचा अपमान केल्याचा आरोप मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी शनिवारी केला. सरकारने आमच्याशी चर्चा करण्यासाठी राज्य मंत्रिमंडळाला पाठवण्याची गरज होती. पण त्यांनी शिंदे समितीला पाठवले. हे साफ चूक आहे. असे करून फडणवीसांनी राज्याचा अपमान केला, असे ते म्हणाले. दरम्यान, न्या. संदीप शिंदे समितीने यावेळी मराठवाड्यातील मराठा समाज हा कुणबी असल्याचे तत्वतः मान्य केले. हा मराठा समाजासाठी एक मोठा दिलासा असल्याचा दावा केला जात आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी केली आहे. यासाठी त्यांनी शुक्रवारपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला सुरुवात केली आहे. त्यांच्या आंदोलनाच्या दुसऱ्या दिवशी राज्य सरकारतर्फे सेवानिवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या नेतृत्वातील समितीने आझाद मैदानावर जाऊन त्यांच्याशी चर्चा केली. त्यात कोणताही तोडगा निघाला नाही. त्यामुळे समिती आल्यापावली परत गेली. त्यानंतर पत्रकारांशी संवाद साधताना मनोज जरांगे यांनी शिंदे समितीला चर्चेला पाठवून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा अपमान केल्याचा आरोप केला.

मनोज जरांगे म्हणाले, शिंदे समितीला इकडे चर्चेसाठी पाठवणे हा मुख्यमंत्र्यांनी राज्याच्या राज्य सरकारचा, राज्याच्या राजभवनाचा व दोन्ही कायदेमंडळाचा केलेला अपमान आहे. कारण, हे काम शिंदे समितीचे नाहीच. मुख्यमंत्र्यांकडून राज्यपाल भवनाचा अपमान होत आहे. सरकारने राज्य मंत्रिमंडळाला चर्चा करण्यासाठी पाठवण्याची गरज होती. पण त्यांनी शिंदे समितीला पाठवले. हे साफ चूक आहे. इथे विधान मंडळ अस्तित्वात आहे. इथे राज्यपाल अस्तित्वात आहेत. त्यानंतरही त्यांनी शिंदे समितीला पाठवून राज्याचा अपमान केला. स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राच्या कायदेमंडळाचा अपमान करण्याचे काम करत आहेत. कदाचित त्यांचे तोंड काळे झाले असेल म्हणून त्यांनी ही समिती पाठवली असेल.

शिंदे समिती आमच्याकडे वेळ मागत होती. पण आम्ही त्यांना एक तासाचाही वेळ दिला नाही. सगेसोयरेच्या मुद्यावर आमची त्यांच्याशी चर्चाच झाली नाही. मराठा व कुणबी एकच आहे. हा 58 लाख नोंदींचा अहवाल आहे. आमचे म्हणणे आहे, त्याचाही त्यांनी एक जीआर काढावा. पण त्यासाठी त्यांना थोडा वेळ हवा आहे. ते चर्चा करून येतो म्हणाले. पाहू केव्हा येतात. पण हे दोन गॅझेटियर, केसेस, बलिदान गेलेल्या कुटुंबाचा विषय व शिंदे समितीचा नोंदी शोधण्याचा विषय या प्रकरणात सरकारला एक तासाचाही वेळ दिला जाणार नाही. कारण, मराठवाड्यातील सगळा मराठा हा कुणबी आहे. सातारा संस्थानमध्ये सुद्धा पश्चिम महाराष्ट्रातील मराठा कुणबी आहे.

शिंदे समितीने बॉम्बे गव्हर्नमेंट व औंध संस्थानच्या गॅझेटियरसाठी वेळ मागितला. या दोन मुद्यांवर वेळ देण्यासाठी आमची तयारी आहे. पण पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्याच्या मुद्यावर एक मिनिटही वेळ मिळणार नाही, असे जरांगे यांनी सरकारला ठणकावून सांगितले.

मनोज जरांगे यांनी यावेळी छत्रपती संभाजीनगर, बीड व जालना जिल्ह्यातील कुणबी कुठे गेले? असा सवालही उपस्थित केला. ते म्हणाले, शिंदे समितीने तब्बल 13 महिने अभ्यास केला. त्यामुळे त्यांनी मराठवाड्यातील मराठा कुणबी आहे असा अहवाल द्यावा. 58 लाख नोंदी ह्या कुणबी व मराठा एकच असल्याचा पुरावा आहे. त्यामुळे सरकारने मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढावा. अर्धे मराठे कुणबी व अर्धे मराठे मराठा असे कसे? अर्धा पश्चिम महाराष्ट्र व अर्धा मराठवाडा कुणबी आहे.
कोकणातील मराठे, पठार भाग मराठा आहे. खानदेश, विदर्भातील मराठे कुणबी आहेत. त्यामुळे सरकारने 58 लाख नोंदी या पुरावा माणून मराठा व कुणबी एकच असल्याचा जीआर काढला पाहिजे. मी या जीआर शिवाय मागे हटणार नाही. छत्रपती संभाजीनगरमध्ये 1 लाख 23 हजार कुणबी होते. ते कुठे गेले? बीड, जालना जिल्ह्यातील कुणबी कुठे गेले? असे ते म्हणाले.

## जरांगे परत का आले? हे शिंदेंना विचारा राज ठाकरेंकडून शिंदेंची कोंडी



**मुंबई :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मुंबईच्या आझाद मैदानावर बेमुदत उपोषण सुरू केलं आहे. या आंदोलनामुळे राजधानीत वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, राज्यातील राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर सूचक टोला लगावला आहे.
ठाण्यातील दौऱ्यात पत्रकारांनी मराठा आरक्षणावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज ठाकरे म्हणाले, मनोज जरांगे परत का आले, हे एकनाथ शिंदेंनाच विचारा. मागच्या वेळी जेव्हा ते नवी मुंबईत गेले होते, तेव्हा प्रश्न त्यांनीच सोडवल्याचे सांगितले होतं. मग आता पुन्हा आंदोलन का उभं राहिलं?" असं म्हणत त्यांनी शिंदेंनाच अप्रत्यक्षपणे जबाबदार धरलं.

दरम्यान, मनोज जरांगेंच्या आंदोलनामुळे राज्य सरकारवर वाढत असलेल्या दबावाच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यात सह्याद्री अतिथीगृहावर सुमारे एक तासभर चर्चा झाली. या बैठकीत मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

खासदार संजय राऊत यांनीही सरकारवर टीकेची झोड उठवली. महायुती सरकारमध्ये तीन वेगळे गट आहेत. शिंदे गट आंदोलकांना वेगळ्या पद्धतीने मदत करत आहे, कारण त्यांचा उद्देश फडणवीसांना अडचणीत आणणं हाच आहे, असा थेट आरोप राऊतांनी केला.

काही दिवसांपूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कौतुक केले होते. यामध्ये ते म्हणाले की, एकनाथ शिंदे साहेब हा माणूस खरा आहे. साथ देतो. जनतेची वेदना समजून घेतो. गोर-गरिबांच्या वेदना जाणून घेतो. सत्तेपेक्षा गोरगरिब जनतेच्या दुःखाला महत्त्व देणारा माणूस म्हणजे एकनाथ शिंदे तर गरिबांचे प्रश्न जाणून घेऊन ताबडतोब सोडवायचे, जनतेचं म्हणणं ऐकून घ्यायचं हे काम तडकाफडकी अजित पवार करतात, असे त्यांनी म्हटले होते.

## नोबेल पुरस्कारासाठी नॉमिनेट न केल्याने भारतावर लादला टॅरिफ



न्यूयॉर्क टाईम्सच्या वृत्तानुसार, भारत आणि अमेरिकेतील तणावामागील खरे कारण ट्रम्प यांची नोबेल पुरस्काराची इच्छा आहे.
अहवालात म्हटले आहे की, ट्रम्प यांनी १७ जून रोजी पंतप्रधान मोदींशी फोनवर चर्चा केली होती. यादरम्यान, ट्रम्प यांनी भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी आणल्याबद्दल त्यांना किती अभिमान आहे असे म्हटले होते.

यानंतर ट्रम्प यांनी मोदींना सांगितले की, पाकिस्तान त्यांना नोबेल पुरस्कारासाठी नामांकित करणार आहे. ट्रम्प यांनी अप्रत्यक्षपणे भारतालाही असेच करण्यास सांगितले. यामुळे मोदी नाराज झाले.

मोदींनी ट्रम्प यांना स्पष्टपणे सांगितले की, भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदीशी अमेरिकेचा काहीही संबंध नाही. हे थेट भारत आणि पाकिस्तानमध्ये घडले आहे.
अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, ट्रम्प यांनी मोदींच्या विधानाकडे दुर्लक्ष केले, ज्यामुळे दोन्ही नेत्यांमधील कटुता वाढली. तेव्हापासून दोघेही एकमेकांशी बोललेले नाहीत.
हा अहवाल वॉशिंग्टन आणि नवी दिल्लीतील डझनभराहून अधिक लोकांशी झालेल्या संभाषणांवर आधारित आहे, त्यापैकी बहुतेकांनी नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले.

या लोकांनी सांगितले की, ट्रम्प आणि भारत यांच्यातील संबंधांचा दोन्ही देशांवर मोठा परिणाम होऊ शकतो. ट्रम्प यांच्या धोरणांमुळे भारत-अमेरिका संबंध कमकुवत होत आहेत.
त्याच वेळी, भारत आपली अर्थव्यवस्था हाताळण्यासाठी पावले उचलत आहे, परंतु त्याचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार अमेरिका यावर नाराज आहे.
वृत्तपत्र लिहिते की, मोदींनी एकेकाळी ट्रम्प यांना 'खरा मित्र' म्हटले होते, परंतु आता त्यांचे संबंध चांगले नाहीत. राष्ट्रपती कार्यालयाशी संबंधित लोकांच्या मते, मोदींना आधी सांगण्यात आले होते की ट्रम्प या वर्षाच्या अखेरीस क्वाड शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी भारतात येतील. परंतु आता ट्रम्प यांचा भारतात येण्याचा कोणताही विचार नाही.

भारतात आता ट्रम्प यांच्या विरोधात नकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या आठवड्यात, महाराष्ट्रात एका उत्सवादरम्यान, ट्रम्प यांचा एक मोठा पुतळा फिरवण्यात आला होता, ज्यामध्ये त्यांना 'पाठीत खंजीर' खुपसणारा म्हणून दाखवण्यात आले होते. अमेरिकेने उचललेल्या कठोर पावलांना एका भारतीय अधिकाऱ्याने थेट 'गुंडगिरी' म्हटले होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ ऑगस्ट २०२५


## एसईबीसी व ओबीसी जात वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी सहा महीने मुदतवाढ मंजुर- डॉ राजेंद्र दाते पाटील यांच्या पाठपुराव्यास यश





**प्रतिनिधी (मुंबई) :** नियमीत जात प्रमाणपत्र पडताळणी समिती स्थापना करून एस ई बी सी आणि ओबीसी जात पडताळणी साठी नव्याने किमान सहा महिन्याची मुदत वाढ द्यावी अशी मागणी सातत्याने मुख्यमंत्र्याकडे पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव व जेष्ठ अभ्यासक डॉ.राजेंद्र दाते पाटील यांनी लाऊन धरली होती.या निर्णयाचा फायदा अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमां साठी २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेल्या एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्या साठी,प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांका पासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आलीआहे.महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने हा निर्णय जाहीर केला असून,सामाजीक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्गा करिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६) राज्यात लागू झाल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांकडे जात वैधता प्रमाणपत्रे उपलब्ध नाहीत. या कायद्यानुसार एसईबीसी प्रवर्गाला शैक्षणिक संस्थां मधील प्रवेशात १० टक्के आरक्षण मिळाले आहे.तसेच मराठासमाजातील काही विद्यार्थ्यांना कुणबी, कुणबी- मराठा किंवा मराठा-कुणबी (ओबीसी) जातीची प्रमाणपत्रे मिळत आहेत. ही प्रक्रिया अजूनही सुरू असल्याने विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्रे मिळालेली नाहीत अशा विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहावे लागू नये यासाठी ही मुदतवाढ देण्यात आली आहे.सदरचा सहा महिन्यांचा कालावधी हा एस.ई.बी.सी व ओबीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत परंतु जात वैधता प्रमाणपत्र विहित वेळेत सादर करू शकले नाहीत केवळ अशा उमेदवारा साठीच राहील. तसेच जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सदर सहा महिन्यांचा कालावधी असेल. जात वैधता पडताळणी समिती स्थिती गंभीर त्यावर सुद्धा निर्णय होणे गरजेचे महाराष्ट्र राज्यात जात वैधता पडताळणी समित्या बाबत विचार करता एकुण ३६ पैकी १४ ठिकाणी अध्यक्ष असुन उर्वरित ठिकाणी प्रभारी अध्यक्ष आहेत. अंतिम दिनांक पर्यंत म्हणजे कट ऑफ डेट रोजी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास प्रवेश आपोआप रद्द होतो यामुळे असंख्य विद्यार्थी आरक्षण व सवलती च्या लाभा पासून वंचित राहत असुन या वर गांभीर्याने निर्णय होणे गरजेचे असल्याचेही जेष्ठ अभ्यासक डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी नमुद केले होते. आमच्या प्रतिनिधी सोबत विशेष बातचीत करताना ते म्हणाले की,माधुरी पाटील विरुध्द शासन या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे अत्यंत महत्त्वाच्या अशा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या राज्यात मनुष्यबळा अभावी सक्षम नाहीत. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाकडून राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत जात प्रमाणपत्र पडताळणी समित्या आहेत परंतु अधिकाऱ्यांची प्रलंबीत पदोन्नती आणि पात्र अधिकाऱ्यांची कमतरता या कारणामुळे राज्यातील ३६ समित्यांचा कार्यभार फक्त चार अध्यक्षांकडे आहे. त्यांच्यासमोर ४० हजार पेक्षा जास्त जात प्रमाणपत्र पडताळणीची प्रकरणे निर्णय घेण्यासाठी पडुन आहेत.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903


## नेमकं चुकलं कोण?

खूप दिवसांपूर्वी
नदीत वाळू
अन्
वाळूत ओल होती.
दु:ख लेकीबाळींचं
उरात घेऊन
ती वाहत होती.

माय ती
जगाची म्हणून
भर उन्हात
उन्हाळ्यात..
ढग दाटून आले की
कोरडीठाक असली तरी
पान्हा फुटावा गाईला

तसं
आत आत झिरपलेलं पाणी
वाळूतून अलगद वर यायचं.
तेव्हा मुक्या जीवांची तहान भागायची.
तसेच दोन्ही काठावरच्या लेकरांना
माया देत देत
ती पुढे जात होती
म्हणून
शिवार ही नटलं होतं
हिरवाईनं अन् माणुसकीनं.

मग
माणसाने
वाळू उपश्याच्या नावाखाली
काळजावर तिच्या घात केला
तेव्हापासून ..
ती रडत नाही
फक्त झुरत असते..
लेकरांसाठी..

आता
येतो तिला पूर..
महाभयंकर. विनाशकारी
अन्.. उध्वस्त होतं जीवन.
नेमकं चुकलं कोण?
नदी की माणूस..
शोध याचा घेतो आहे
चुकलेला माणूस..

**ज्ञानेश्वर गायके कन्नड**
**मो.९४०३३८४८८९**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ ऑगस्ट २०२५


# विमुक्त दिन : संघर्ष, स्वातंत्र्य आणि सन्मानाचा प्रवास

भारतीय सामाजिक इतिहासात काही असे अध्याय आहेत, जे अन्याय, शोषण आणि दडपशाहीच्या सावलीत दीर्घकाळ झाकोळले गेले होते. त्यातीलच एक महत्वाचा अध्याय म्हणजे 'विमुक्त जाती-जमातींचा' इतिहास होय. ब्रिटिश शासन काळात १८७१ च्या 'गुन्हेगार जमाती कायदा'च्या नावाखाली अनेक भटक्या, विमुक्त व पारंपरिक जीवन जगणाऱ्या जातींा-जमातींना गुन्हेगार म्हणून कलंकित केले गेले होते. हा कलंक इतका कठीण होता की त्या काळातील संपूर्ण समाजाने या जाती-जमातींना गुन्हेगार म्हणूनच ठरवले होते व त्यांना गुन्हेगार म्हणूनच ओळखले जात होते. १८७१ च्या 'गुन्हेगार जमाती कायद्यामुळे त्यांच्या हालचालींवर निर्बंध आले होते, गावोगाव पोलिसात नोंद ठेवली जाऊ लागली होती, आणि रोजच्या आयुष्यातील प्रत्येक हालचाल संशयाच्या नजरेतून पाहिली जाऊ लागली होती. १८७१ च्या 'गुन्हेगार जमाती कायदा' या अन्यायकारक कायद्यामुळे अनेक पिढ्या छळ सहन करत राहिल्या होत्या. भारतातील या 'विमुक्त जाती-जमातींकडे न शिक्षणाची सोय होती, न रोजगाराची हमी, न सामाजिक प्रतिष्ठा होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भटके आणि विमुक्त जाती-जमातींच्या हक्क व अधिकारांसाठी लढा देऊन त्यांच्या उद्धारासाठी प्रयत्न केले होते. अशा ऐतिहासिक पार्श्वभूमीवर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सरकारने या कायद्याला रद्द करून या समाजाला "विमुक्त" घोषित केले. त्या दिवसाच्या स्मृती म्हणून दरवर्षी "विमुक्त दिन" साजरा केला जातो.विमुक्त दिनाचा उल्लेख म्हणजे केवळ एका कायद्याच्या रद्दबातल होण्याची आठवण नाही, तर हा दिवस म्हणजे शतकानुशतकांचा अन्याय पुसून टाकण्याचा, 'विमुक्त जाती-जमातींना' नवजीवन देण्याचा आणि मानवी हक्कांची जाणीव करून देण्याचा दिवस आहे. 'गुन्हेगार' हा ठप्पा काढून 'विमुक्त' हा सन्मान देणे ही स्वातंत्र्योत्तर भारतातील सामाजिक न्यायाच्या दिशेने झालेली एक मोठी क्रांती होती. हा दिवस त्या लाखो भटक्या, विमुक्त, पारंपरिक, कष्टकरी जाती-जमातींच्या मुक्तीचा दिवस आहे, ज्यांनी अन्याय सहन करतानाही आपली संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्ये टिकवून ठेवली होती. तथापि, केवळ कायदा रद्द झाला म्हणून सर्व प्रश्न मिटले नाहीत. तर आजही अनेक विमुक्त व भटक्या जाती-जमातींच्या जीवनात असंख्य अडचणी आहेत. त्यांच्यापैकी मोठा भाग आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहे. शिक्षणाच्या संधी अपुऱ्या आहेत. रोजगाराच्या बाबतीत त्यांना स्थैर्य मिळालेले नाही. स्थलांतरित जीवनपद्धतीमुळे त्यांना शासकीय योजनांचा पूर्ण लाभ मिळत नाही. अजूनही त्यांच्याकडे पत्त्याचा पुरावा, जमिनीचा हक्क किंवा कायमस्वरूपी ओळखपत्र नसल्याने अनेक भटके-विमुक्त जाती-जमातीतील कुटुंबे मूलभूत सोयींपासून वंचित राहत असलेले दिसून येतात.भटक्या, विमुक्त जाती-जमाती ह्या मूळतः कलावंत, श्रमिक आणि लोकधारा पुढे नेणाऱ्या जाती-जमाती आहेत. काही जाती-जमातींची लोककला, नृत्य, गाणी आणि कथा सांगण्याच्या परंपरा या आपल्या सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहेत. तगडी स्मरणशक्ती, कष्टकरी हात आणि सृजनशीलता ही या जाती-जमातींची खरी संपत्ती आहे. परंतु ऐतिहासिक अन्यायामुळे आणि सामाजिक गुन्हेगारी कलंकामुळे या गुणांना योग्य व्यासपीठ मिळालेले नाही. आजही या जाती-जमातींना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व्यापक प्रयत्नांची गरज आहे. विमुक्त दिन म्हणजे फक्त स्मरणाचा दिवस नाही, तर तो आत्मपरीक्षणाचाही दिवस आहे. आपण खरोखरच या समाजाला मुख्य प्रवाहात आणले आहे का? त्यांना समतेची व संधीची खरी हमी दिली आहे का? अजूनही अनेक विमुक्त जाती-जमाती राजकीय प्रतिनिधित्वापासून दूर आहेत. त्यांचा आवाज निर्णयप्रक्रियेत ऐकू येत नाही. त्यांच्या मुलामुलींना शिक्षणासाठी योग्य वातावरण मिळावे, यासाठी शासकीय धोरणे अधिक प्रभावी व्हायला हवीत. आरोग्य, पोषण, निवारा, रोजगार आणि स्त्री-पुरुष समानता या क्षेत्रांत अजूनही त्यांची प्रगती थांबलेली दिसते.आज 'विमुक्त दिना'च्या निमित्ताने आपण हा संकल्प करायला हवा की समाजातील कोणत्याही घटकाला केवळ त्यांच्या भूतकाळामुळे दोषी ठरवले जाणार नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेले भारताचे संविधान भारतातील प्रत्येक नागरिकाला समानतेचा, शिक्षणाचा, रोजगाराचा आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार देते. म्हणूनच विमुक्त जाती-जमातींना न्याय मिळवून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. शासनाने या समाजाच्या पुनर्वसनासाठी जरी विविध योजना आखल्या असल्या तरी त्या प्रत्यक्षात पोहोचवण्यासाठी ठोस पावले उचलली जाणे आवश्यक आहे. विमुक्त जाती-जमातींनी इतिहासाच्या अंधारातून प्रवास करून आजच्या उजेडात यायचा प्रयत्न केला आहे. या प्रवासात त्यांना अनेक सामाजिक नेत्यांनी मार्गदर्शन केले. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे यांसारख्या सामाजिक विचारवंतांनी त्यांना नवा आत्मविश्वास दिला. त्यांच्या लेखनाने व विचारांनी विमुक्त जाती-जमातींना स्वतःच्या ओळखीचा अभिमान दिला. या परंपरेचा पुढाकार आजच्या पिढीने घ्यायला हवा.आजचा विमुक्त दिन आपल्याला आठवण करून देतो की स्वातंत्र्य म्हणजे केवळ राजकीय स्वातंत्र्य नाही, तर सामाजिक व आर्थिक समतेचे स्वातंत्र्यही तितकेच महत्वाचे आहे. 'विमुक्त' हा शब्द फक्त काही जाती-जमातींपुरता मर्यादित नाही, तर तो प्रत्येक त्या व्यक्तीशी संबंधित आहे जी अन्यायाविरुद्ध लढते, जी व्यक्ती सन्मानाने जगण्याचा अधिकार मागते. या जाती-जमातींचा सन्मान म्हणजे मानवतेचा सन्मान आहे. आज आपण डिजिटल युगात प्रवेश केला आहे. पण विमुक्त समाज अजूनही डिजिटल जगाच्या सीमेवर आहे. त्यांना तंत्रज्ञान, ऑनलाईन शिक्षण, शासकीय सेवा व रोजगार यांचा पूर्ण लाभ मिळालेला नाही. यासाठी शासनाने तसेच सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन त्यांच्या सक्षमीकरणासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. विशेषतः तरुण पिढीला शिक्षण व कौशल्य प्रशिक्षण देणे हा त्यांच्या प्रगतीचा आधार ठरेल.विमुक्त दिन हा दिवस समाजातील विषमता नष्ट करण्याचा, भूतकाळातील चुका न विसरण्याचा आणि भविष्यात समानतेचा नवा मार्ग निर्माण करण्याचा आहे. या दिवसाचे स्मरण करून आपण एकत्रितपणे ठरवूया की कोणत्याही नागरिकाला अन्यायाच्या ओझ्याखाली दबून राहावे लागणार नाही. विमुक्त समाजाच्या पुनर्वसनाचा प्रवास म्हणजे मानवतेच्या पुनर्जागरणाचा प्रवास आहे. म्हणूनच आज विमुक्त दिन साजरा करताना आपण त्या लाखो कुटुंबांना वंदन करूया ज्यांनी संघर्ष करूनही आपली ओळख टिकवून ठेवली. त्यांच्या कष्टातून, त्यांच्या कलाकृतीतून आणि त्यांच्या जीवनातून आपल्याला धैर्य, चिकाटी आणि स्वाभिमान शिकायला मिळाला आहे. त्यांच्या मुक्तीच्या संघर्षातून आपण सर्वांनी बोध घ्यायला हवा, कारण अन्यायाचा इतिहास जरी वेदनादायी असला तरी न्यायाचा भविष्यकाळ आपण सर्वांनी एकत्रितपणे घडवायचा आहे.




**डॉ. राजेंद्र बगाटे, नाशिक**
**(लेखक, सहाय्यक प्राध्यापक असून समाजशास्त्र आणि मराठीचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**ईमेल – bagate.rajendra4@gmail.com**


## श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** येथील श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्थेची आयोजित १६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा श्रीराम मंगल कार्यालयात शनिवारी (ता. ३०) रोजी उत्साहाच्या वातावरणात पार पडली. या पतसंस्थेचे चेअरमन शिवशरण वरनाळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत ३१ मार्च २०२५ च्या ताळेबंद, नफातोटा व विविध विषयावर सविस्तर चर्चा करताना यंदाच्या आर्थिक वर्षात या पतसंस्थेस २९ लाख ९३ हजार ८२८ रुपयाचा निव्वळ नफा झाला असून या पतसंस्थेकडे यंदा १३ कोटी ४० लाख ७२ हजार ९४९ रुपयाच्या ठेवी, संस्थेने यंदाच्या आर्थिक वर्षात १ कोटी ५३ लाख १६ हजार ४४५ रुपयाचे कर्ज वाटप केले आहे. संस्थेची गुंतवणूक ४ कोटी ८५ लाख १३ हजार १२७ रुपये असून या संस्थेचे ३७२० सभासद आहेत. संस्थेच्या स्थापनेपासूनच ऑडीट वर्ग 'अ ' दर्जा प्राप्त असून संपूर्ण संगणकीकृत, मानाचा विभागीय दीपस्तंभ पुरस्कार प्राप्त झाला असल्याचे अध्यक्षीय समारोप प्रसंगी त्यांनी सांगितले. यावेळी शिवसेना नेते भीमराव वरनाळे, चंद्रशेखर मुदकण्णा, शिवसेना तालुका प्रमुख बळीमामा सुरवसे, जगन्नाथ पाटील, व्यंकटराव पाटील, तानाजी फुकटे, चेतन पाटील, सायबणप्पा हिरमुखे, प्राचार्य दत्तात्रय इंगळे, चेतन पाटील, किसन खंडागळे, देवानंद बिराजदार, प्रशांत मुदकण्णा, भागवत सोनवणे, शंकर पाटील, भगत माळी, खय्युम चाकूरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. सभेतील विषय पत्रिकेचे वाचन शाखाधिकारी दत्तात्रय कांबळे यांनी करून बहुमताने सर्व ठरावास एकमताने सहमती घेतली. किसन खंडागळे यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त केले. पतसंस्थेचे उपाध्यक्ष शरणप्पा मुदकण्णा, सचिव कमलाकर जाधव, संचालक संगीता अशोक जाधव, वंदना सोनवणे, मनिष मुदकण्णा, श्रीशैल बिराजदार, बाबासाहेब पाटील, इंद्रजित लोखंडे, कॅशिअर चिदानंद स्वामी, राजेंद्र मुदकण्णा, प्रशांत काशेट्टे, सचिन कंटेकूरे, नेहा रावळकर, संतोष मुदकण्णा, महातंय्या स्वामी, गुंडेराव गुरव आदींनी पुढाकार घेतला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य दत्तात्रय इंगळे यांनी केले. सभेचे सूत्रसंचालन संचालक मनोज बोंदर तर आभार अमृत वरनाळे यांनी मानले. यावेळी पंचक्रोशीतून बहुसंख्येने सभासद, पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ ऑगस्ट २०२५


## मिटमिटा गावठाण हद्दीतील बाधितांना नियमानुसार मोबदला देण्यात येणार - मनपा आयुक्त जी श्रीकांत



**पडेगाव (प्रा. शिवाजी गायकवाड) :** पडेगाव येथील नागरी समस्या आणि बाधित क्षेत्र तील नागरिकांच्या समस्यानसाठी केसर लॉन मिटमिटा येथे मनपा आयुक्त यांच्या प्रमुख उपस्थितीत नागरी समस्या आणि ज्यांची घरे अथवा जागा अतिक्रमित झालेली आहे त्या बाबत शंका निरसन कारणासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा भाजप पदाधिकारी दीपक बनकर यांनी बैठकीचे आयोजन केले होते . सदर बैठकीत मिटमिटा -पडेगाव भागातील नागरिकांच्या समस्या व ज्यांची घरे बाधित झालेली आहे त्यांच्या साठी मनात असलेली शंका निरसन करण्यात अली .यावेळी आयुक्त जी श्रीकांत यांनी बरेच मुद्दे यांवर चर्चा करून नागरिकांच्या शंका दूर केल्या .यावेळी सहउपायुक्त सविता सोनवणे, माजी नगरसेवक सुभाष शेजवळ, सलीम पटेल, रखमाजी जाधव,दिलीप जाधव, दिलीप मुळे, बाबा मुळे, सुनील मगरे, राजेश जाधव, शिवाजी गायकवाड, अमोल मुळे आदीची उपस्थिती होती तसेच मिटमिटा -पडेगाव येथिल प्रतिष्ठित नागरिक, विविध पक्ष, संघटनासह विविध क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते.या बैठकीत जे नागरिक मुख्य रस्त्यातवरील ६० मीटर रस्त्याच्या अंतर्गत येणारे बाधित झाल्यानं मोबदला नियम व अटीनुसार देण्यात येणार आहे .तसेच ज्यांची घरे गावठाण हद्दीत बाधित झाले असतील अशा बाधितांना स्वाथाहुन टी डी आर स्वीकारल्यास त्या घरातील एका व्यक्तीला नियम व अटींसह मनपाच्या सेवेत सामावून घेण्यात येईल . तरी नागरिकांनी आपल्या भागातील जागेची गुंठेवारी त्वरित करून घ्यावी .त्यासाठी परिसरात गुंठेवारी कॅम्प लावण्यात येईल यासाठी नागरिकांना जागेवरच गुंठेवारीचे कागदपत्रे देता येईल अशी व्यवस्था मनपा च्या वतीने लवकरच करण्यात येईल असे सांगितले . यावेळी मिटमिटा -पडेगाव येथील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते . नागरिकांनी मनपा आयुक्तांसमोर समस्या मांडून व शंकांचे निरसन केले .

## मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे आज पालक मेळावा संपन्न झाला. मेळाव्यात शाळेतील विविध उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली. विद्यार्थ्यांनी वाद्य, गायन व नृत्य स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवले आहे.महान हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा करण्यात आला यानिमित्त लोकसेवा आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या सहयोगी प्राध्यापक क्रीडा विभाग प्रमुख , रायफल शूटिंग राष्ट्रीय पदक विजेत्या, आंतरराष्ट्रीय खेळाडू डॉ. अस्मा परविन सय्यद (पीएचडी रायफल शूटिंग) यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना क्रीडा स्पर्धांद्वारे करिअर करण्याचे आवाहन केले. तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मुकुंदवाडी शाळेच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता जिल्हास्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत 11 पदके मिळवून यश संपादन केले. या कार्यक्रमास मा. नगरसेवक श्री. कमलाकर जगताप, मुख्याध्यापक श्री. के. बी. चौधरी, सहशिक्षक श्री सचिन गायकवाड, क्रीडा शिक्षक सय्यद इरफान संगीत शिक्षक, श्री अजय शेंडगे, श्री संदीप मुर्तडकर तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

## होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल 'संस्कृत अनुरागी शाळा' पुरस्काराने सन्मानित



**छत्रपती संभाजीनगर :** संस्कृत प्रतिष्ठान संस्थे तर्फे दिला जाणारा 'डॉ. चंपालाल देसरडा संस्कृत अनुरागी शाळा पुरस्कार २०२५ ', ह्या वर्षी ' होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल ' शाळेला मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्कृतदिनाच्या औचित्यानेसंस्कृत भाषेच्या प्रचार व प्रसाराच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. जी शाळा विद्यार्थ्यांमध्ये संस्कृत भाषेचे जतन करते व शिकण्यासाठी प्रोत्साहन देते, वर्षभरात संस्कृत विषयक स्तुत्य उपक्रम घेते त्या शाळेला हा पुरस्कार देण्यात येतो. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह,रोख रक्कम आणि प्रमाणपत्र असे होते. संस्थेच्या वतीने हा पुरस्कार शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस,शाळेचे संस्कृत शिक्षक गिरीश जोशी, अनिरुद्ध महाजन ह्यांनी स्वीकारला. यावेळी श्री.विनोद कुलकर्णी,श्रीमती देसरडा मॅडम, डॉ. क्रांती व्यवहारे, डॉ नवल थोरात, डॉ पंकजा वाघमारे, डॉ अजय निलंगेकर इत्यादी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. या पुरस्कारानिमित्त होली क्रॉस शाळेच्या सिस्टर सिंथिया फर्नांडिस, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिनी, पर्यवेक्षक मोहम्मद हाफिजुद्दीन,सर्व शिक्षकवृंद ह्यांनी संस्कृत शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students

Government Recognised

Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT

X-RAY | C.T.-SCAN

E.C.G. | Radiology

Physiotherapy | Optometry

O. T. TECHNICIAN

PG Radiology

Contact : 9405109103 8830838903



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.

कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.

संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३१ ऑगस्ट २०२५


## इनोव्हा कार ची पिकअप रिक्षा ला धडक दोन जण जखमी





**दौलताबाद (जावेद अहमद) :** नाशिक हायवे महामार्गावर दौलताबाद टी पॉईंट येथे दि ३० ऑगस्ट शनिवार रोजी दुपारी झाला.अपघातग्रस्त माळ वाहतूक करणारी रिक्षा क्र MH.20.DE.2604 व इनोव्हा कार क्र MH.28.BK.2021 इनोव्हा ही माळीवाडा कडून छत्रपती संभाजी नगर कडे जात होती तर पिकअप रिक्षा ही छत्रपती संभाजी नगर कडून दौलताबाद कडे जात असताना दौलताबाद टी पॉइंट वर समोरासमोर अपघात झाला आहे. जगतगुरु नरेंद्र महाराज संस्थानच्या रुग्णवाहिकने घटनास्थळी जाऊन अपघातग्रस्ताना छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालय मध्ये दाखल केले. जखमी झालेल्या युवकांचे नाव १)अशोक गोविंद जाधव, वय-४५ वर्ष राहणार कुंभारवाडा दौलताबाद २) रंजित आसाराम आढाव, वय-३५ वर्ष राहणार गवळीवाडा दौलताबाद, ता, जि:- छत्रपती संभाजीनगर.

## जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत प्रतिभा निकेतन माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे यश




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** उमरगा तालुक्यातील मुरूम येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तीन दोन विद्यार्थी जागतिक बॅडमिंटन स्पर्धेत घवघवीत यश मिळवल्याबद्दल राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त ठाणे येथे दि.29/08/2025 रोजी ठाणे येथील खासदार श्रीकांत शिंदे व भारताचा फिरकी पटू हरभजन सिंग यांच्या हस्ते इयत्ता 12 वर्गातील आर्यन बिराजदार व अर्जुन बिराजदार यांना पारितोषिक व रोख रक्कम देऊन सन्मानित करण्यात आले. व तालुकास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेत 19 वर्षे वयोगटातील इयत्ता 12 वर्गातील साक्षी अजय वेदपाठक, क्रतीका गोपाल इंगोले, साक्षी संजय बेंडकाळे, प्रणाली नेताजी चौधरी, सलोनी बिराप्पा बंदीछोडे, या विद्यार्थिनी तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत यश घेऊन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक व संस्थापक आधारस्तंभ माजी राज्यमंत्री बसवराज पाटील साहेब, नगर शिक्षण विकास मंडळ मुरूम अध्यक्ष श्री बापूरावजी पाटील साहेब व उमरगा जनता बँक चेअरमन व संचालक शरण बसवराज पाटील, व संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले यांच्यासह प्राचार्य उल्हास घुरघुरे पर्यवेक्षक विवेकानंद पळसाळगे ज्येष्ठ शिक्षक संजय गिरी सर उमाकांत महामुनी सर आधीसह यांनी अभिनंदन केले. यांना मार्गदर्शन क्रीडाशिक्षक सुजित शेळके व नारायण सोलंकर यांची लाभले.

## शिवाजी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने राष्ट्रीय खेळ दिन साजरा



**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** भारत शिक्षण संस्था संचलित श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथे राष्ट्रीय राष्ट्रीय छात्र सेना यांच्या वतीने राष्ट्रीय खेळ दिन साजरा करण्यात आला . दरवर्षी 29 ऑगस्ट रोजी देशाचा महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिन 2025 ची थीम 'शांततापूर्ण आणि समावेशक समाजांना प्रोत्साहन देण्यासाठी खेळ' ही होय.या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे डॉ गिरिधर सोमवंशी प्रमुख वक्ते एनसीसीचे कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले होते यांनी आपल्या भाषणात या दिवसाचे महत्त्व सांगुन मेजर ध्यानचंद यांच्या हॉकिच्या खेळाचा संपूर्ण इतिहास सांगून त्यांना 'हॉकीचा जादूगार ' म्हणून मेजर ध्यानचंद यांना ओळखले जाते. ते भारतीय हॉकी खेळातील एक महान खेळाडू होते आणि त्यांच्या उत्कृष्ट कौशल्य, आक्रमकता, निपुणता आणि खेळातील योगदानामुळे त्यांना हा सन्मान दिला गेला. त्यांच्या जन्मदिनाच्या दिनी 29 ऑगस्ट रोजी भारतात राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणुन साजरा केला जातो .ऑलिंपिक हॉकीपटू मेजर ध्यानचंद स्वातंत्र्यपूर्व काळात प्रसिद्ध झाले.दुसऱ्या महायुद्धापूर्वीच्या काळात या खेळावर वर्चस्व गाजवणाऱ्या भारतीय हॉकीपटू ध्यानचंद यांनी उन्हाळी ऑलिंपिकमध्ये भारताला ऑलिंपिक सलग तीन वेळा सुवर्णपदकांची पहिली हॅटट्रिक पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.ब्रिटीश राजवटीच्या काळात भारतीय सैन्याच्या रेजिमेंटल संघातून हॉकी कारकिर्दीला सुरुवात केली .ध्यानचंद हा एक प्रतिभाशाली , मेहनती , खेळाडुवृत्ती असा गुणवान खेळाडु होता .ध्यानसिंग रात्री चांदण्याखाली हॉकीचा सराव करत असे, त्यामुळेच त्यांना ध्यानचंद हिंदीत चांद म्हणजे चंद्र हे नाव देण्यात आले . त्यांच्या जादुई हॉकीमुळे आणि खेळाच्या आक्रमकतेमुळे हॉकीच्या जगावर त्याने अधिराज्य केले ज्यामुळे त्यांना 'हॉकी विझार्ड' असे नाव देण्यात आले. त्यांच्या कारकीर्द मध्ये 185 सामन्यात 400 हून अधिक गोल केले . सर्वकालीन महान हॉकी खेळाडूंपैकी एक ते होते .भारत सरकारने त्यांना पद्मभूषण सर्वोच्च नागरी पुरस्कार देऊन सन्मान केला. सरांनी ध्यानचंदचा आदर्श घेऊन यापुढे होणाऱ्या ऑलंपिक स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक खेळात भारताला अव्वल स्थान मिळवून दयावे असे भाषणात सांगितले . या कार्यक्रमासाठी क्रिडा विभागाचे प्रा विजय पवार , डॉ राजु सुर्यवंशी प्रा गोविंद गायकवाड, डॉ अनिल देशमुख प्राध्यापक, प्राध्यापिका,एनसीसी कॅडेटस , विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कॅडेट सिद्धु झांपले तसेच सुत्रसंचलन प्रमोद शुनगार व आभार कॅडेट प्रेमनाथ जमादार यांनी केले .


Education of the Day

YCMOU सेंटर कोड : 21187

YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी

B.A.(मराठी व उर्दू माध्यम)

M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन

9405109103, 8830838903

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002